जा.क्र. मुदवसुअ/प्रा/परिपत्रक/ 665 /२०२३
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्राधिकरण
कक्ष क्र. ५१८, चौथा मजला, गृहनिर्माण भवन,
बांद्रा (पुर्व), मुंबई ४०००५१
दि. 11/07/2023

# दक्षता विभागाचे परिपत्रक -४

विषय- पुनर्विकसित इमारतीमधील पुनर्वसन सदनिका व इतर सदनिकांसाठी भाग भोगवटा प्रमाणपत्राबाबत.

म्हाडाच्या विभागीय मंडळांतर्गत बांधण्यात आलेल्या इमारती तसेच मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतीच्या पुनर्विकासासाठी संबंधित मंडळातर्फे ना हरकत प्रमाणपत्र जारी केले जाते. सदर पुनर्विकासामध्ये साधारणत: चार भाग असतात.

१] इमारतीमधील मूळ गाळेधारकांचे / सदस्यांचे पुनर्वसन.

२] इमारतीमधील मूळ अनिवासी गाळेधारकांचे पुनर्वसन.

३] म्हाडाच्या हिश्शातील सदनिका.

४] विक्री हिश्शातील सदनिका.

या परिपत्रकाद्वारे असे सूचित करण्यात येते की, मूळ गाळेधारकांच्या [निवासी व अनिवासी] पुनर्वसनासाठी भाग भोगवटा प्रमाणपत्र [Part Occupation Certificate] प्रस्तावित करता येईल. तथापि, मूळ गाळेधारकांचे [निवासी व अनिवासी] पुनर्वसन झाल्यानंतर तसेच म्हाडा हिश्शातील गाळे ताब्यात घेतल्यानंतरच विक्री सदनिकांसाठी भाग भोगवटा प्रमाणपत्र प्रस्तावित करण्यात यावे. मुळ गाळेधारकांचे [निवासी व अनिवासी] पुनर्वसन झाल्याशिवाय तसेच म्हाडाच्या हिश्शातील सदनिका प्राप्त झाल्याशिवाय विक्री घटकांसाठी भाग भोगवटा प्रमाणपत्र प्रस्तावित करण्यात येऊ नये.

सदर परिपत्रकाचे काटेकोर पालन करावे.

(विनीत अग्रवाल)
अपर पोलीस महासंचालक तथा
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.

प्रति,
मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ/ मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ/ ~~मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ~~, कोंकण मंडळ/नाशिक मंडळ/पुणे मंडळ/अमरावती मंडळ / नागपूर मंडळ./ औरंगाबाद मंडळ
प्रत,
अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण यांना माहीतीसाठी सादर
उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा यांना माहितीसाठी सादर.